जळगाव दि.१ (प्रतिनिधी ) सध्या वन विभागाचा वन महोत्सव सुरु असून विद्यार्थ्यांनी अधिकाधिक झाडे लावावीत व त्यांचे संवर्धन करावे. तसेच एकल प्लॅस्टीकचा वापर टाळण्याची मानसिकता तयार करावी असे आवाहन जळगाव जिल्ह्याचे उप वन संरक्षक ए. प्रवीण यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात रासेयोच्या कुलगुरु उन्हाळी शिबीराचे (सृष्टी संवर्धन २०२४) उद्घाटन करतांना केले.

विद्यापीठाच्या रासेयो विभागाच्या वतीने दि. १ ते ७ जुलै दरम्यान हे शिबीर होत असून यामध्ये १५० रासेयो स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. सोमवारी झालेल्या उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी होते. तर प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, ॲड. अमोल पाटील, नितीन झाल्टे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, वित्त व लेखा अधिकारी सीए रवींद्र पाटील, अधिसभा सदस्य डॉ. संदीप नेरकर, अमोल मराठे, स्वप्नाली काळे व रासेयो संचालक डॉ. सचिन नांद्रे मंचावर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

उद्घाटन सत्रात पुढे बोलतांना ए. प्रवीण यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी जळगाव जिल्ह्यातील वनांना भेट द्यावी. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सजग रहावे. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देत त्यांनी सांगितले की, प्रशासकीय सेवेत यशस्वी व्हायचं असेल तर प्रथम स्वत:वर विश्वास ठेवा, नियमित वर्तमानपत्रे वाचन करावे, सखोल अभ्यास करुन प्रचंड मेहनत व वेळेचा सदुपयोग करणे आवश्यक आहे.

व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे यांनी सांगितले की, ग्लोबल वॉर्मिंगचे परिणाम आपण पाहत आहोत त्याकरीता सृष्टी संवर्धन करणे गरजेचे असून तरुणांचा सहभाग महत्वाचा आहे. तसेच जळगाव जिल्ह्याच्या सभोवताली असलेल्या वन संपदेचा, वन्य जीव, पक्षी निरीक्षण यांचा अभ्यास करुन ग्रीन करीअर मध्ये असलेल्या संधी मिळवाव्यात.

अध्यक्षीय समारोप करतांना कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी सांगितले की, ग्लोबल वॉर्मिंगचे दुष्परीणाम आपल्या घरापर्यंत पोहचले आहे. त्यामुळे आपण स्वयं प्रेरणेने पर्यावरण संवर्धानाच्यादृष्टीने प्रयत्न करावेत. एकल वापरासाठीच्या प्लॅस्टीकचा वापर टाळला पाहिजे. रासेयोचे हे शिबीर विद्यार्थ्यांना चांगली संधी आहे. विद्यार्थ्यांनी आभासी मित्र न बनवता प्रत्यक्ष मित्र बनवावे, आजच्या युगात नियमित पदवी अभ्यासक्रमासोबतच कौशल्य, अनौपचारीक व मूल्य शिक्षण आत्मसात केले पाहिजे. संवदेनशील नागरीक बनावे, समस्यांवरील उपायांसाठी स्वयं प्रेरीत रहावे, वेळेचे महत्व व भान लक्षात ठेवावे असे आवाहन केले.

रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे यांनी प्रास्ताविकात या शिबीराचा उद्देश सांगून रासेयो विभागाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. आभार कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन रासेयो जिल्हा समन्वयक प्रा.दिनेश पाटील यांनी केले. या शिबीराच्या यशस्वीतेसाठी डॉ. मनोज इंगोले, डॉ. मनीष करंजे, डॉ.पी.बी.पाटील (राजूसर), कक्ष अधिकारी शरद पाटील, रासेयो विभागातील शिक्षकेतर कर्मचारी, स्वयंसेवक प्रयत्न करीत आहेत.

दुपारच्या सत्रात व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे यांनी भारतीय सैम्य संपदा या विषयावर व्याख्यान दिले. यासत्राचे अध्यक्ष जनसंपर्क अधिकारी डॉ.सुनील पाटील हे होते. तसेच त्या नंरतच्या सत्रात मानवविज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. जगदीश पाटील यांनी शाश्वत जीवन शैली या विषयावर व्याख्यान दिले. यावेळी अध्यक्षस्थानी अधिसभा सदस्य भानुदास येवलेकर हे होते.

उद्या मंगळवार, दि. २ जुलै रोजी पुणे येथील रासेयो प्रादेशिक संचालक अजय शिंदे हे माय भारत पोर्टल डिजीटल लिटरसी या विषयावर व्याख्यान देतील यावेळी विकास तळेले हे अध्यक्षस्थानी असतील. त्यानंतच्या सत्रात विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.जयेंद्र लेकुरवाळे हे करीअरच्या वाटा या विषयावर व्याख्यान देतील. यावेळी अध्यक्षस्थानी अधिसभा सदस्य प्रा.सुनील निकम हे असतील.

**बातमी नं. २**

जळगाव दि.१ (प्रतिनिधी )कवयित्री बहिणबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेतर्फे सुरू होणाऱ्या बी.कॉम. (ऑनर्स) (बीएफएसआय) या अभ्यासक्रमासंबधी विस्तृत माहिती दि. ३ जुलै २०२४ रोजी विद्यार्थी पालक यांना प्रशाळेत दिली जाणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विद्यापीठाच्या व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेत नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांर्तगत बी.कॉम. (ऑनर्स) (बीएफएसआय) या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाचे प्रवेश सुरू झाले आहेत. हा

अभ्यासक्रमाविषयी सखोल माहिती देण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या सेक्टर स्कील्स कौन्सिलचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. यावेळी विद्यार्थी व पालक यांना व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत बुधवार दि.३ जुलै रोजी दुपारी २ वाजता उपस्थित राहण्याबाबत आवाहन संचालक प्रा.मधुलिका सोनवणे यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

**बातमी नं. ३**

जळगाव दि.१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सेवेतून श्री. सुनील चव्हाण दि. ३० जून रोजी सेवानिवृत्त झाले त्यांना कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या प्रमुख उपस्थितीत निरोप देण्यात आला.

विद्यापीठाच्या बांधकाम विभागातील सहायक श्री. सुनील चव्हाण विद्यापीठाच्या सेवेतून निवृत्त झाले. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देवून त्यांचा सपत्नीक गौरव करण्यात आला. यावेळी प्र.कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.योगेश पाटील, अधिसभा सदस्य सुरेखा पाटील हे उपस्थित होते. यावेळी विद्यापीठ कर्मचारी संघटना, मागसवर्गीय कर्मचारी संघटना आणि पतपेढी यांच्या वतीने देखील सेवानिवृत्त कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कक्ष अधिकारी प्रवीण चंदनकर यांनी केले.

.........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १ जुलै, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी